


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३६५, शनिवार ९ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# भाजपाचे टेंडर भरणारे कसले निष्ठावान शिवसैनिक?

■ खा. नीलेश लंके यांचा संदेश कार्ले यांच्यावर हल्लाबोल

■ नगर तालुक्यातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा

**निमगांव वाघा : विशेष प्रतिनिधी**

**निष्ठावान शिवसैनिक उपद्याप करत नाहीत. तुम्ही शिवसेनेचे निष्ठावान म्हणता दुसरीकडे भाजपाचे टेंडर भरता मग तुम्ही कसले निष्ठावान शिवसैनिक ? उध्दव ठाकरे यांना अपमानास्पद पध्दतीने वर्षा बंगल्याबाहेर काढले त्याचा बदला घेण्याची वेळ आलेली असताना तुम्ही बंडखोरी करता असे सांगत खा. नीलेश लंके यांनी शिवसेनेचे बंडखोर उमेदवार संदेश कार्ले यांचे नाव न घेत हल्लाबोल केला.**

यावेळी बोलताना खा. लंके पुढे म्हणाले, शिवसेनेची व्याख्या मला सांगू नका. माझ्या हातात आजही शिवबंधन आहे. स्वाभिमानी मतदार बंडखोरी खपवून घेणार नाही. हे ठरावीक गावांत फिरतात. लोक बुक्क्याच्या गाडीत नव्हे तर गुलालाच्या गाडीत बसतात. आमच्या व्यासपीठावर निष्ठावान लोक असल्याचे लंके यांनी सांगितले.

लंके पुढे म्हणाले, ही निवडणूक राज्याच्या हिताची आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार राज्यात येणार ही काळया दगडावरची पांढरी रेघ आहे. आपला उमेदवार विजयी होणारच आहे. फक्त मताधिक्क्याचा प्रश्न शिल्लक असल्याचे सांगत ही निवडणूक फार पुढे निघून गेल्याचे लंके म्हणाले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्रा.शशिकांत गाडे हे होते.यावेळी माधवराव लामखडे, प्रताप शेळके, बाळासाहेब हराळ, संपत म्हस्के, बाबासाहेब गुंजाळ, घनश्याम म्हस्के, बाळासाहेब कोतकर, संजय जपकर, आबासाहेब कर्डिले, शिवा होळकर, पोपट खामकर, एकनाथ झावरे, साहेबराव बोडखे, अजय लामखडे, विद्या भोर, बाळासाहेब गायकवाड, केतन लामखडे, गंगाधर रोहकले, वसंत पवार, अशोक शिंदे, मंजाबापू निमसे,व्ही.डी. काळे, अशोक धनवटे, शंकर साठे, छबु महांडुळे, तुकाराम कातोरे, भाऊराव गायकवाड, बाळासाहेब पानसंबळ, पप्पू कोल्हे, संजय पाटील, विकास रोहोकले, गौरव नरवडे, विलास होळकर, वसंत ठोकळ, सुरेश ढवळे, अंकुश काळे, राजकुमार आघाव, प्रदीप धुंगार्ड, दिलीप नाट, प्रशांत साठे, भास्कर भोर, बबन भोर, संदिप खेसे, भानुदास लाळगे, धोंडीभाऊ रुपनर, कचरू कांडेकर, सुभाष परभणे, भानुदास भगत, राजू नरवडे, पप्पू ऊरमुडे, राधाकृष्ण वाळुंज, गजानन पुंड, गोरख काळे, भाऊ सोनवणे,दिपक कार्ले, राजेंद्र गावखरे, विलास जपकर, जनार्धन माने, अरुण लांडगे, महेश काळे,, गोकुळ जाधव, पोपट पुंड, नंदा शेंडगे, डॉ.बबनराव डोंगरे, प्रविण कोठुळे आदी. उपस्थित होते.



■ महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ नगर तालुक्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा निमगांव वाघा येथे पार पडला.

## बहिण, मुलीला काहीतरी जास्त दिले पाहिजे

राणी लंके ही नगर तालुक्यातील मुलगी, बहिण आहे तिला काहीतरी जास्त दिले पाहिजे. नगर तालुक्यात सन २००७ पासून महाविकास आघाडी असून आम्ही एकत्रीत काम करतो आहोत. आज काही लोकांची महत्वाकांक्षा वाढली आहे. माधवराव, मी देखील निवडणूक लढविण्याचा अनुभव घेतला. म्हशीच्या शिंगात डोके घालू नको असे आम्ही आमच्या सहकाऱ्याला सांगितले होते मात्र त्याने ऐकले नाही. विरोधकांनी हिंदू धर्माची वाटणी केली असून ते थांबविण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले पाहिजे. गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्राचे वाटोळे झाले आहे. वैचारीक वाटोळे इतके झाले आहे की कोणाला कोणाची भिती राहिली नाही. पैशावर सत्ता हाती घेता येते असा विरोकांचा भ्रम होता मात्र लोकसभा निवडणूकीत खा. नीलेश लंके यांनी तो भ्रम दुर केला.

**प्रताप पाटील शेळके**
मा. सभापती, जिल्हा परिषद

## २५ ते ३० हजारांचे मताधिक्य देणार

मतदारसंघात राणी लंके यांनी आघाडी घेतली असून प्रचाराची एक फेरी पुर्ण झाली आहे. त्या मोठया मताधिक्क्याने विजयी होतील. नगर तालुका लंके यांना २५ ते ३० हजारांचे मताधिक्य देईल. शेतकऱ्यांचे प्रश्न महाविकास आघाडी सोडवू शकते.

**डॉ. बबनराव डोंगरे**

## चांगल्या विचारांच्या लोकांना बरोबर घ्यायचे आहे

हा मतदार संघ राज्यात चांगल्या विचारांच्या दिशेने न्यायचा आहे. आता मी देखील महाविकास आघाडीमध्ये आहे. भविष्यात चांगल्यास विचारांच्या लोकांना बरोबर घेऊन विकासाचे प्रलंबित प्रश्न सोडवायचे असल्याचे लंके म्हणाले.

## नगर तालुक्याची लाडकी बहिण म्हणून एकशिक्की मतदान करा

टक्केवारी न सांगता विश्वासाने काम करा. नगर तालुक्यातील शिवसैनिकांनी महाविकास आघाडीचे काम करावे. नगर तालुक्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी राणी लंके यांच्या पाठीशी आहेत. सर्वजण एकसंघपणे प्रचार करणार आहेत. सकाळी एक व रात्री एक असे होणार नाही. नगर तालुक्याची लाडकी बहिण म्हणून तालुक्याने एकशिक्की मतदान करावे.

**वसंत ठोकळ**

## काही जण टेंडरसाठी निवडणूकीत !

काही लोक निवडणूकीसाठी तर काही टेंडरसाठी उभे राहतात. लोकसभा निवडणूकीत राजकारणातील मोठया माणसाला धुळ चारण्याचे काम नीलेश लंके यांनी केले. विरोधकांना सुजय विखे विजयी होणार याची खात्री होती तर सर्वेक्षणात मात्र नीलेश लंके हे नेहमीच पुढे होते. कोरोना संकटात सर्वात मोठे काम नीलेश लंके यांनी केले. लंके यांनी लोकसभेची निवडणूक जिंकली मात्र त्यांचे कार्यकर्ते कधीही हुरळून गेले नाहीत. खासदारांची पत्नी म्हणून राणी लंके यांची ओळख नाही. पंचायत समिती, जिल्हा परिषदमध्ये त्यांनी चांगले काम केले आहे. माधवरावांच भरकटलेलं मोठ जहाज भरकटले होते. मात्र ते पुन्हा जागेवर आले. कार्यकर्त्यांनी गाफील न राहता ग्रामपंचायतीच्या निवडणूकीप्रमाणे प्रचार करावा.

**संभाजी रोहोकले**
तालुकाध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेस .

## जिल्ह्यात महाविकास आघाडीला चांगले वातावरण

लोकसभेप्रमाणेच आता विधानसभेलाही वातावरण आहे. अनेक सर्वेमध्ये महाविकास आघाडीची सत्ता येईल असे सांगितले आहे. विरोधकांना ११७ पर्यंतच जागा मिळतील. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार यावर शिक्कामोर्तब झालेले आहे. येणारे सरकार हे शेतकरी हिताचे येणार आहे. कापूस, सोयाबीन, दूध उत्पादक शेतकर्यांच्या हिताचे असेल. सध्या कापसाला, सोयाबीनला भाव मिळत नाही. दूध उत्पादकांना अनुदान मिळालेले नाही. जिल्ह्यात विकास आघाडीचे वातावरण चांगले आहे.

**प्रा. शशिकांत गाडे**
शिवसेना जिल्हाप्रमुख

## बुडत्या जहाजात बसायला कोणी तयार नाही

२४ तास ३६५ दिवस आम्ही झटतो आहोत, म्हणून जनता आमच्या सोबत आहे, प्रेम करते. आज निवडणूका आल्या म्हणून भुछत्रासारखे ते उगवले आहेत. महायुतीच्या उमेदवारासोबत अनेक जण आपल्यासोबत येण्यासाठी फोन करत आहेत. काहींनी विरोधी उमेदवाराला घोडयावर बसविले. उमेदवारी मिळवून दिली, तेच आता इकडे येण्यासाठी धडपड करत आहेत. कारण बुडत्या जहाजात बसण्यासाठी कोणी तयार नसल्याचे लंके म्हणाले.

## प्रवरेचे टेंडर !

म्हशीच्या शिंगात डोकं घालण्यासाठी पैसा मिळत असेल तर डोके घालायला अडचण काय ? हे प्रवरेचे टेंडर आहे. तुम्ही काय शिवसेनेच्या निष्ठा सांगता ? स्वतःला स्थानिक म्हणता मग आम्ही पाकीस्तानी आहोत का ? चार गावांचे तुम्ही टेंडर घेतले काय ? तुमचे नगर तालुक्यात बुथ लागणार नाही. मी डोक्यात घेतले तर ग्रामपंचायत सदस्य होऊ देणार नसल्याचे इशारा खा. लंके म्हणाले.

## मी बोललो तर झाक उतरेल

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर कार्यकर्त्यांनी फोन केल्यावर सांगता फार अवघड आहे असे ते सांगत होते. मी त्यांच्याविषयी सविस्तर बोललो तर तुमची झाक उतरेल. नगर शेजारच्या मतदार संघांसाठी हे टेंडर आहे. राहुरी, पारनेर, श्रीगोदे मतदार संघातील शिवसैनिकांना भडकविले जात आहे. जो सोबत त्याला घेऊन जो नाही त्याला सोडून निवडणूक लढविण्याची माझी तयारी असते असे सांगत लंके यांनी संदेश कार्ले यांचे नाव न घेता टीकास्त्र सोडले.

## ताकदीने निवडणूक लढविणार

आपण मोठया मताधिक्क्याने विजय होणार असलो तरी आपल्याला ही निवडणूक पुर्ण ताकदीने लढवावी लागेल. कारण पुढच्या निवडणूकीला त्याचा फायदा होणार आहे. लोकसभेला काहींची चुक झाली, आज त्यांनी चुक मान्य करून ते विधानसभेच्या निवडणूकीत सक्रीय झाले आहेत. लोकसभेला कार्यकर्ते गाफील राहील्याने नगर तालुक्यात मताधिक्य कमी झाले या निवडणूकीत मात्र तसे होणार नसल्याचे खा. लंके म्हणाले.

## त्यांच्या पक्षाचे सर्वेक्षणात सांगितलंय कोण विजयी होणार !

स्थानिक मुद्दा काय काढता ? राणी लंके कुठली आहे याची कुंडली तपासा. राणी या तुमच्याच तालुक्यातील आहेत. आपला विजय अटळ आहे, तो कोणीही रोखू शकत नाही. किमान एक लाखांनी उमेदवार विजयी झाला पाहिजे असे काम करा. राज्यात पहिल्या पाच विजयी उमेदवारांमध्ये आपला उमेदवार विजयी होणार असून जे आपल्या विरोधात उमेदवार आहेत त्यांच्याच पक्षाचे हे सर्वेक्षण आहे. सल्ल्यात कुस्ती आहे ही त्यामुळे जास्त अंगावर घेऊ नका. समोरचे उमेदवार दुसऱ्याच्या झेंडयावर पंढरपूर करणारे हे आहेत. सर्वजण वेगवेगळया हेतूने उभे आहेत. त्यांना समाजाचे देणे घेणे नसल्याचे सांगतानाच लंके यांनी विरोधकांवर शरसंधान केले.

## ३३ सरपंचांची उपस्थिती

४२ पैकी ३३ गावांचे सरपंच मेळाव्यास उपस्थित आहेत. मते वाया घालू नको असे आम्ही आमच्या सहकाऱ्याला सांगितले मात्र त्यांनी ऐकले नाही. मला आलेले अनुभव मी त्यांना सांगितले मात्र त्यात यश आले नाही. १२ पैकी ४ उमेदवार पाठींबा देण्यासाठी तयार आहेत. मात्र तो पाठींबा घ्यायचा की नाही हे सर्व पदाधिकाऱ्यांनी ठरवावे. नगर तालुक्यात साठ टक्के मते राणी लंके यांना मिळणार असून उर्वरीत ४० टक्के मते इतर उमेदवारांना मिळतील. मताधिक्य वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत.

**माधवराव लामखडे**, मा. जि. प. सदस्य

## नगरची वाघिण विधानसभा गाजविणार

पत्र्याच्या घरामध्ये राहणाऱ्या माणसाने दिल्ली हलविली. आज राणीताई उमेदवार आहेत. राणीताईमुळे मतदारसंघातील महिला घराबाहेर पडल्या आहेत. दुसरीकडे राज्यात महिलांचा अपमान केला जातो. महिलांचा अपमान थांबविण्यासाठी सर्वसामान्य शेतकऱ्याची मुलगी विधानसभेत पाठवायची आहे. नगर तालुक्याची वाघिण विधानसभा गाजविणार आहे.

**ओंकार धावडे**

# महायुती सरकारने गरीबांसाठी तिजोरी खाली केली !

■ दादाभाऊ चितळकर यांचा विरोधकांवर हल्लाबोल

■ नगर तालुक्यात काशिनाथ दाते यांचा प्रचार दौरा



**नगर : प्रतिनिधी**

**महायुती सरकार गोरगरीबांसाठी तिजोरी खाली करत असताना दुसरीकडे विरोधकांनी आपल्या तुंबडया भरण्याचेच काम केल्याचा हल्लोबोल करतानाच गेल्या सत्तर वर्षात विरोधकांनी काय केले याचा जाब मतदार निश्चित विचारतील असा विश्वास दुध संघाचे मा. चेअरमन दादाभाऊ चितळकर यांनी व्यक्त केला.**

देऊळगांव सिध्दी येथे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत चितळकर हे बोलत होते. यावेळी विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, गणेश शेळके, सुनील थोरात, वसंत चेडे, सुभाष दुधाडे, विक्रम कळमकर, अशोक चेडे, पंढरीनाथ उंडे, धनंजय निमसे, दत्ता पवार यांच्यासह नगर तालुक्यातील कार्यकर्ते यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

चितळकर म्हणाले निवडणूक डोळयापुढे ठेऊन कोणी कितीही विकासाच्या गप्पा मारल्या तरीही मतदार शाश्वत आणि निरंतर विकास प्रक्रिया राबविणाऱ्या सरकारच्या पाठीशी खंबिरपणे उभी राहणार आहे. सध्याचे राजकारण पाहिले तर गरीबांनी पदाकडे जायचे नाही का असा सवाल करून हे पुढारी राजकरणात घराणेशाही आणू पाहत असल्याची टीका त्यांनी केली. काशिनाथ दाते हे अतिशय चांगले उमेदवार आहेत. सुसंस्कृत आहेत. सर्वसामान्य उर्वरीत पान ३ वर

## दाते सर सुसंस्कृत चेहरा

गेल्या ४० वर्षात पारनेर तालुक्यात सहकार क्षेत्रात काम करणारा सुसंस्कत चेहरा म्हणून दाते सरांची ओळख आहे. तुमचे काही प्रश्न असतील तर मी तुमच्या जवळचा म्हणून मला ते सांगा.सर्व समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. दिवाळी निमित्त बहिणींना पैसे पाठविले हा अजितदादांचा वादा आहे. दादांचा हा शिलेदार तुमच्यासाठी तत्पर आहे.

**प्रशांत गायकवाड**
संचालक, जिल्हा बँक

# आमदार सौभाग्यवती प्रचाराच्या मैदानात !

## शहर ,उपनगर व विविध वसाहतींमध्ये महिलांची संवाद



**नगर : प्रतिनिधी**

**महायुतीचे उमेदवार आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या सौभाग्यवती,माजी नगरसेविका शीतल जगताप या निवडणूकीच्या मैदानात उतरल्या असून नगर शहर उपनगर व विविध वसाहतींमध्ये महिलांच्या गाठीभेटी घेवून आ.जगताप व महायुती सरकारने राबविलेल्या विविध कामांची माहिती त्या देत आहेत.**

महिलांशी संवाद साधताना शीतल जगताप म्हणाल्या की,राज्यातील महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात महिलांना केंद्रस्थानी ठेवत भरपूर योजना सुरु केला आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारख्या अनेक योजना या महिलांना आधार देणाऱ्या आहेत. नगरमध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून या सर्व योजनांचा लाभ शहरातील महिलांना मिळत आहे. नगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार संग्राम जगताप हे कायम प्रयत्नशील असल्याचे जगताप यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांनी केलेल्या विकासकांची सविस्तर माहिती, तसेच राज्य सरकारच्या महिलांसाठीच्या योजनांची माहिती शीतल जगताप महिलांना देत आहेत. सर्व ठिकाणी त्यांच्या या छोट्या बैठकांना महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.आज नगर शहरातील सर्वच भागांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या निधीतून विकास उर्वरीत पान ३ वर



# चंदेरी

छोट्या पडद्यावरील मालिकांमुळे अनेक कलाकार घराघरांत लोकप्रिय होतात. 'माझी तुझी रेशीमगाठ', 'का रे दुरावा', 'रमा राघव' अशा गाजलेल्या मालिकांमध्ये खलनायिकेची भूमिका साकारणाऱ्या शीतल क्षीरसागरने आज प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. नुकत्याच स्टार मीडिया मराठीला दिलेल्या मुलाखतीत शीतलने तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत खुलासा केला आहे.

## लग्नामुळे शीतलला लोक मारतात टोमणे!

लग्न झालेलं नाही. त्यामुळे लोक टोमणे मारतात, असं अभिनेत्रीने या मुलाखतीत सांगितलं. शीतल म्हणाली, लग्नाबद्दल प्रश्न विचारणं साहजिक आहेत. आयुष्य हे प्रत्येकासाठी सारखं नसतं. तुमच्या फूटपट्टीने इतरांचं आयुष्य तोलू मापू शकत



नाही. हा माझा प्रवास आहे, मी एन्जॉय करते आहे. बरेचजण असे प्रश्न विचारतात. अनाहूत सल्ले देतात. इकडतिकडची स्थळं सुचवतात. मला राग येत नाही. शीतल म्हणाली, रस्त्यात आजीबाई विचारतात, तेव्हा मी सांगते, माझं अजून लग्न झालेलं नाही. तेव्हा त्या आजीबाईंना प्रश्न पडतो. अरे तुझं का लग्न झालं नाही? इतकी छान दिसतेस, मग का नाही झालं. आपले ठोकताळे असतात. तसं घडत नसलं की धक्का बसतो. समोरच्यामध्ये काहीतरी कमी आहे असं नसतं. अमुक वयात शिक्षण पूर्ण करा, मग नोकरी करा. मग लग्न करा. मूलबाळ असा ठरलेला पॅटर्न आहे. घर-फार्महाऊस-विदेशवारी. हे ठोकताळे आहेत. सगळ्यांचं आयुष्य तसं नसतं. तुम्ही त्यांच्या नजरेत अपयशी ठरता. माझ्यासारख्या अनेकजणी आहेत, अनेकजण आहेत. नाराज-निराश व्हायचं कारण नाही. मी माझी कंपनी एन्जॉय करते. हा लोनलीनेस नाही, हा सॉल्टिट्यूड आहे, असं मत शीतलने मांडलं.

## गर्भवती असूनही दीपिका पदुकोण करतेय शूटींग!



**लवकरच आई होणारी अभिनेत्री दीपिका पदुकोण नुकतीच 'सिंघम अगेन'च्या सेटवर दिसली. 'गुड न्यूज' दिल्यानंतर पहिल्यांदाच दीपिकानं तिचं बेबी बंप दाखवलं. आगामी चित्रपटासाठी ॲक्शन सीक्वेन्सचं शूटिंग करण्यासाठी अभिनेत्री पोलिसांच्या गणवेशात सेटवर आली होती. याचे फोटोज सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.**

पोलिसांचे खाकी कपडे, केसांचा बन, डोळ्यांवर ग्लासेस अशा लूकमध्ये अभिनेत्री सेटवर सज्ज झाली होती. दीपिकाने एक सीन शूट केला. ज्यामध्ये गुंडांच्या पोशाखात अनेक पुरुष होते. हाय वेस्ट पॅन्ट आणि मोठा बेल्ट लावून अभिनेत्रीनं बेबी बंप लपवण्याचा प्रयत्न यात केला गेला आहे, असं दिसतंय. दीपिका पदुकोणच्या फॅन पेजेसवरून हे फोटोज शेअर झाले होते. या फोटोजमध्ये दीपिकाच्या फाईट सीन्सपूर्वी अभिनेत्री दिग्दर्शक रोहित शेट्टी आणि स्टंट टीमच्या सदस्यांकडून सूचना घेताना दिसते आहे. दीपिका प्रेग्नंट असल्यानं तिच्या फायटिंगचे सीन ती करणार नसून, तिच्याऐवजी स्टंट्स करणारी दुसरी व्यक्ती असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. शूटिंगच्या ठिकाणी दीपिकासारखेच कपडे आणि हेअरस्टाईल असणारी व्यक्ती तिथे उपस्थित होती. तेव्हा दीपिकाचं शूटींग सुरू होतं. 'सिंघम अगेन' चित्रपटाद्वारे दीपिका पहिल्यांदाच पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात शक्ती शेट्टी ही भूमिका साकारत लेडी सिंघम म्हणून दीपिका रोहित शेट्टीच्या पोलिसी संघात सामील झाली आहे. 'सिंघम अगेन'चं चित्रीकरण गेल्या वर्षी हैदराबादमध्ये सुरू झालं. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन' १५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दीपिका पदुकोणसह या चित्रपटात अजय देवगण, रणवीर सिंग, करीना कपूर-खान, अक्षय कुमार व टायगर श्रॉफ हे कलाकार मुख्य भूमिकांत झळकणार आहेत.

## प्रार्थना बेहेरेला नकोय मूल, कारण...


**'मितवा', 'कॉफी आणि बरंच काही' या चित्रपटांमुळे अभिनेत्री प्रार्थना बेहेरे घराघरांत लोकप्रिय झाली. मोठ्या पडद्यावर पदार्पण करण्याआधी तिने अनेक हिंदी मालिकांमध्ये प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. 'पवित्र रिश्ता' सारख्या गाजलेल्या मालिकेत प्रार्थनाने महत्त्वाची भूमिका साकारली होती. अभिनय क्षेत्रात जम बसवल्यावर अभिनेत्रीने २०१७ मध्ये अभिषेक जावकरबरोबर लग्न केलं.**

लग्नानंतर प्रार्थनाने काही काळ मनोरंजनविश्वातून ब्रेक घेतला होता. परंतु, त्यानंतर 'माझी तुझी रेशीमगाठ' या लोकप्रिय मालिकेतून प्रार्थनाने छोट्या पडद्यावर मोठ्या दणक्यात पुनरागमन केलं. यामध्ये तिच्याबरोबर श्रेयस तळपदे, बालकलाकार मायरा वायकुळ यांच्या प्रमुख भूमिका होत्या. 'माझी तुझी रेशीमगाठ'मुळे प्रार्थनाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात वाढला. मालिकेने निरोप घेतल्यावर प्रार्थना आपला नवरा आणि सासरच्या मंडळींबरोबर अलिबागला शिफ्ट झाली. त्याठिकाणी तिने कुत्रे, मांजरी, घोडे असे अनेक प्राणी पाळले आहेत. याबाबत प्रार्थनाने नुकत्याच 'दिल कें करीब'ला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केलं आहे. काही महिन्यांआधी अभिनेत्रीने तिच्या युट्यूब चॅनेलच्या माध्यमांतून मूल होऊ न देण्याबद्दल भाष्य केलं होतं. आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत प्रार्थनाने या वैयक्तिक आयुष्यात घेतलेल्या या निर्णयामागचं कारण सांगितलं आहे. अभिनेत्री म्हणते, माझ्या नवऱ्याला आणि मला प्राणी खूप आवडतात. त्यामुळे आम्हाला मूल नको असं आम्ही ठरवलं होतं. आता आमच्या घरी जे प्राणी आहेत ते सगळे एकूण एक प्राणी आमची मुलं आहेत आणि आम्ही दोघंही त्या सगळ्यांची खूप जास्त काळजी घेतो, त्यांना सांभाळतो. मूल होऊ न देण्याचा निर्णय मोठा होता पण, यात आमच्या घरच्या दोन्ही कुटुंबांनी आम्हाला पाठिंबा दिला, समजून घेतलं. माझे सासू-सासरे, आई-बाबा दोन्ही कुटुंबांनी हा निर्णय आमच्यावर सोडला होता. माझ्या नवऱ्याचं प्राण्यांवर प्रचंड प्रेम आहे. एका कुत्र्याला जरी काही झालं तरी आम्ही दोघंही बैचेन होतो. त्या मुक्या जनावराला आपली जास्त गरज आहे त्यामुळे त्यांच्यासाठी जगूया असा विचार आम्ही केला, असं प्रार्थनाने सांगितलं. दरम्यान, गेल्या वर्षभरापासून प्रार्थना तिचा नवरा अभिषेक आणि सासरच्या कुटुंबीयांबरोबर अलिबागला राहते. त्याठिकाणी त्यांचं आलिशान घर आहे. याशिवाय अभिनेत्रीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर लवकरच ती 'बाई गं' या चित्रपटात अभिनेता स्वप्नील जोशीबरोबर महत्त्वाची भूमिका साकारणार आहे.



## वल्लरी विराजचं शिक्षण किती?

'झी मराठी' वाहिनीवर १८ मार्चपासून 'नवरी मिळे हिटलरला' नवी मालिका सुरू झाली. आज या मालिकेला एक महिना पूर्ण होतं आहे. अभिनेता राकेश बापट व अभिनेत्री वल्लरी विराज यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेने अल्पावधीत प्रेक्षकांच्या मनात घर निर्माण केलं आहे. अशातच लीला म्हणजे वल्लरी विराजने चाहत्यांशी संवाद साधला आणि चाहत्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.



वल्लरी विराजने इन्स्टाग्रामवरील 'आस्क मी सेशन'द्वारे चाहत्यांनी संवाद साधला. या वेळी चाहत्यांनी तिला आवडणाऱ्या कलाकारापासून ते तिचं शिक्षण असे अनेक प्रश्न विचारले. तिला एकदा चाहत्याने विचारलं की, तुझा आवडता कलाकार कोणता? ज्याबरोबर तुला काम करायला आवडेल ते तुझं स्वप्न आहे. यावर वल्लरीने अभिनेत्री मुक्ता बर्वेचा फोटो शेअर करून उत्तर दिलं. त्यानंतर अभिनेत्रीला आवडत्या सहकलाकारांविषयी प्रश्न विचारला. तेव्हा वल्लरीने सांगितलं, रेवू म्हणजे अभिनेत्री आलपिनी निसळ आणि मावशी आई म्हणजेच अभिनेत्री शितल क्षीरसागर हे दोन सहकलाकार वल्लरीला आवडतात. वल्लरीला तुझं शिक्षण काय? असा देखील एका चाहत्याने प्रश्न विचारला. यावर वल्लरी म्हणाली, BFM Graduate (बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट्स, Bachelor of Financial Markets) दरम्यान, वल्लरीने 'नवरी मिळेल हिटलरला' मालिकेपूर्वी बऱ्याच मालिका व चित्रपटात काम केलं आहे. तिने तिच्या अभिनयाचा ठसा हिंदीत उमटवला आहे. गेल्या महिन्यात तिचा 'कन्नी' चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात वल्लरीच्या सोबतीला हता दुर्गुळे, शुभंकर तावडे, अजिंक्य राऊत हे कलाकार होते.

## मंगळसूत्र घालण्याबद्दल क्षिती स्पष्टच बोलली!

**अभिनेत्री क्षिती जोगनं मालिका, नाटक, चित्रपट आणि वेब सीरिज या चारही माध्यमातून आपल्या दमदार अभिनयाचा ठसा उमटवला आहे. फक्त मराठीतच नाही तर हिंदी सिनेसृष्टीत क्षितीनं एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या करण जोहर दिग्दर्शित 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' चित्रपटातील तिच्या भूमिकेचं खूप कौतुक करण्यात आलं होतं. त्यानंतर क्षिती 'झिम्मा २' चित्रपटात पाहायला मिळाली. आपल्या सहसुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी क्षितीनं नुकतंच एका मुलाखतीमध्ये मंगळसूत्र घालण्याबाबत स्पष्ट मत मांडलं. क्षिती एका कार्यक्रमात सहभागी झाली होती. या कार्यक्रमात तिने लग्नानंतरचा एक किस्सा सांगितला.**

क्षिती म्हणाली, की मी कुठेतरी गेले होते. तेव्हा मी मंगळसूत्र घातलं नव्हतं. लग्नानंतर एक-दीड वर्षातील ही गोष्ट असेल. तू मंगळसूत्र नाही घातलं? तुझं नुकतंच लग्न झालंय ना?, असं विचारायला लागले. म्हटलं, त्याला माहितीये ना मी त्याची बायको आहे आणि मला माहिती आहे ना तो माझा नवरा आहे. तुला माहीत असो किंवा नसो. मला काय फरक पडतोय. म्हणजे ते घातल्याने काय होणार आहे? मला मंगळसूत्र खूप आवडतं. तो खूप सुंदर दागिना आहे, असं माझं मत आहे. पण ते माझ्या मनावर आहे. पण मी हे तुमच्यासाठी करत नाही. मी माझ्यासाठी करते. मला माहिती आहे. माझं लग्न झालंय. मंगळसूत्र घातलं काय किंवा न घातलं काय. मग या ज्या गोष्टी आहेत ना, ते त्याला (नवऱ्याला) नाही विचारत? की अरे तुझं लग्न झालंय ती मुलगी किती छान दिसते असं का म्हणालास तू? असं नाही होतं ना म्हणजे तो सहज गप्पा मारतो ना. अरे ही किती छान दिसते, ते चालतं. तर असे बोर लोकं असतात. त्यांना माझ्या मते वेल्ला टाइम असतो वेल्ला. घरी वेळीच लहानपणी आईने फटके नाही घातले ना. मला तर नेहमी असं वाटतं, आईने वेळीच धपाटे घालते असते ना तर ही वेळ नसती आली, असं क्षिती म्हणाली.





## लग्नाआधी काशी विश्वनाथच्या दर्शनाला पोहोचली आरती सिंह

**गोविंदाची भाची व लोकप्रिय अभिनेत्री आरती सिंह २५ एप्रिल रोजी लग्नबंधनात अडकणार आहे. तिच्या लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. ३९ वर्षांची आरती आपल्या आयुष्यातील नवीन प्रवासासाठी खूप उत्सुक आहे. तिने लग्नाच्या एका आठवड्याआधी काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन घेतले.**


कॉमेडियन व अभिनेता कृष्णा अभिषेकची बहीण आरती सिंह बिझनेसमन दीपक चौहानशी लग्न करतेय, तो नवी मुंबईचा आहे. काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन घेऊन तिने लग्नाची पत्रिका मंदिरात ठेवली व देवाचे आशीर्वाद घेतले. 'इन्स्टंट बॉलीवूड'ने शेअर केलेल्या फोटोंमध्ये आरती लाल रंगाच्या साडीत दिसत आहे. ती मंदिरात पत्रिका हातात घेऊन उभी आहे. पत्रिकेत मोठ्या अक्षरात लिहिलेली तिची व दिपकची नावं दिसत आहेत. आरती सिंहने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यात तिचं सजलेलं घर पाहायला मिळतंय. घर आकर्षक विद्युत रोषणाने सजवल्याचं फोटोत दिसतंय. लग्नाला आता १० दिवस बाकी आहेत, असं कॅप्शन आरतीने या फोटोला दिलं आहे. आरती व दीपक यांचं अरेंज मॅरेज आहे. ते गेल्या वर्षी जुलैमध्ये भेटले होते. त्यानंतर त्यांनी एकत्र वेळ घालवला आणि लग्न करण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्रीने काही दिवसांपूर्वीच तिच्या लग्नाची तारीख जाहीर केली.

## वयाच्या 15 व्या वर्षीच विद्या बालन पडली प्रेमात!

**आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'दो और दो प्यार' येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली.**

नुकत्याच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं.

मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला. पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला



फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला. चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं. दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित 'दो और दो प्यार' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## शॉर्ट न्यूज

### जिल्हा मुख्यालयाचे स्वप्न साकारणार

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्हा भौगोलिकदृष्ट्या मोठा आहे. जिल्ह्याचे विभाजन करण्यासाठी विधानसभेत प्रश्न उपस्थित करणारा आपण पहिला आमदार आहे. श्रीरामपूर हेच जिल्ह्याचे मुख्यालय असावे यासाठी पाठपुरावा करणार, अशी ग्वाही आमदार लहू कानडे यांनी दिली. शहरातील काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत कानडे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक, माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अरुण आदी उपस्थित होते.

### साडेतीन लाखांची रोकड जप्त

**राहुरी :** राज्यात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना पोलिस पथकाने साडेतीन लाखांची रोकड जप्त केली. जप्त केलेली रक्कम भरारी पथकासमक्ष राहुरी पोलिस ठाण्यातील मुद्देमाल कक्षात जमा करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिली. राहुरी विधानसभा पोलिस निरीक्षक ठेंगे यांना गुप्त खबऱ्यामार्फत शाकीर सत्तार शेख रा. वांबोरी हा तरुण दुचाकी मोपेड वाहन क्र. एम एच १६ डीके ८०५ मध्ये रोख रक्कम घेऊन जात असल्याचे समजले.

### शेतजमीनच्या वादातून जबर मारहाण

**नगर :** तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील रहिवासी बाळासाहेब कदम यांना त्यांच्या चुलत भावाने वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वादातून जबर मारहाण केली. यासंदर्भात बाळासाहेब कदम यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. बाळासाहेब कदम यांची वडिलोपार्जित असलेली १४ एकर शेतजमीन बाळासाहेब यांचे चुलते व चुलत भाऊ हे एकटेच शेती करतात. त्यांच्याकडे शेती मागण्यासाठी गेलो असता त्यांनी मला व माझ्या कुटुंबीयांना जबर मारहाण केली.

### कोपरगाव मतदारसंघाच्या विकासाचा मेगाप्लान

**कोपरगाव :** आ. आशुतोष काळे यांनी बुधवारी (दि. ६) रोजी पत्रकार परिषद घेऊन कोपरगाव मतदार संघाच्या विकासाचा मेगाप्लान कार्यकर्त्यांसमोर मांडला. तसेच कोपरगावच्या विकासाचे व्हिजन स्पष्ट करताना मतदार संघाच्या विकासाचे घोषणापत्र जाहीर करत कोपरगावकरांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. कोपरगाव विधानसभा मतदार संघात केलेल्या विकासकामांच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आ. आशुतोष काळे पुन्हा एकदा विजयाची पुनरावृत्ती करण्यास सज्ज झाले आहे.

### मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधांची खात्री करा

**शिर्डी :** विधानसभा मतदारसंघातील २७० मतदान केंद्रावर मतदानावेळी मतदारांना किमान आवश्यक सुविधा पुरवणे आवश्यक आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी मतदानापूर्वी स्वतः मतदान केंद्रांना भेट देऊन पाहणी करीत मुलभूत सुविधांच्या उपलब्धतेची खात्री करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर यांनी दिले. राहाता येथील शिर्डी विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल मोरे आदी उपस्थित होते.

# लोकशाही बळकट करण्यासाठी शंभर टक्के मतदान करा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन



**नगर : प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत महानगरपालिकेच्या शहर बस सेवेतील सर्व बस गाड्यांवर पोस्टर लावून जनजागृती करण्यात आली. शहरात मोठ्या प्रमाणात नागरिक शहर बस सेवेचा लाभ घेतात.**

शहराच्या सर्व भागात बसेसच्या माध्यमातून सेवा दिली जाते. त्यामुळे या बसेसवर पोस्टर लावून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी अहिल्यानगर शहरातील मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते शहर बस सेवेतील गाड्यांवर पोस्टर लावून त्याचे अनावरण करण्यात आले. शहरातील बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेतले जात आहेत. महापालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे.

सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी यावेळी सांगितले.

# वढू बुद्रुक येथून आ.पवारांच्या प्रचाराचा श्रीगणेशा

## गावभेट दौऱ्यात पवारांना वाढता प्रतिसाद

**शिरुर : प्रतिनिधी**

**सत्तेत सहभागी न झाल्याने कारखाना बंद पाडण्याचे पाप सत्ताधारी लोकांनी केले.मात्र या निवडणुकीत जनता त्यांच्या या कृत्याला माफ करणार नाही.कारखाना कसा सुरु होत नाही तेच मी पाहतो असे शरद पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे कारखाना लवकरच सुरु होईल याबाबत अजिबात चिंता करू नका.शरद पवार यांच्या मागे तरुणांचे मोठे पाठबळ असल्याने राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार आहे.मतदान यंत्रामध्ये माझे नाव पहिल्याच क्रमांकावर आहे.**

त्यामुळे बघाबघीच्या भानगडीत पडू नका. राज्याचे भवितव्य ठरविणारी ही निवडणूक असल्याने सर्वांनी आपणच उमेदवार आहे असे समजून मतदान करावे.असे आवाहन आमदार अशोक पवार यांनी केले.वढू बुद्रुक (ता. शिरूर)येथे गाव भेट दौरा कार्यक्रमात ते बोलत होते.

वढु बुद्रुक(ता.शिरूर) येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेऊन आ.अशोक पवार यांनी प्रचाराचा श्रीगणेशा केला.मंगळवारी (ता.५) पवार यांनी तालुक्यातील वढू बुद्रुक,कोरेगाव भीमा,आपटी, वाजेवाडी, पिंपळे जगताप, वाडा पुनर्वसन, डिंग्रजवाडी, धानोरे, दरेकरवाडी, सणसवाडी, शिक्रापूर, कोंढापुरी, भांबर्डे आंबळेसह अनेक गावांना भेटी दिल्या.

पवार म्हणाले,विरोधकांनी मला त्रास देण्यासाठी माझ्याच नावाचे दोन उमेदवार उभे केले आहेत. मात्र जनता ही सुज्ञ आहे ती मलाच मतदान करेल.बँकेचा संचालक करतो,एमआयडीसीत ठेकेदारी देतो मात्र त्यासाठी आमच्या पक्षात या अशी अनेक प्रलोभने सत्ताधारी पक्षाचे नेते अनेकांना पक्षात घेण्यासाठी



दाखवत आहेत.मात्र या मलिदा गँगला या निवडणुकीत जनता त्यांना कदापि माफ करणार नाही.मतदारसंघातील उर्वरित कामे मार्गी लावली जातील.दुसऱ्याचा पक्ष चोरू नका तर स्वतः चा पक्ष काढा असं म्हणणाऱ्या लोकांनीच पक्ष फोडले.काही आमदार पक्ष फोडले.तीच लोकं रात्री वेशांतर करुन पक्ष फोडाफोडीचं काम करत होते.या निवडणुकीत मला विजयी केल्यास राज्याने नव्हे तर देशाने आदर्श घ्यावा असे काम करून दाखवणार आहे.

चासकमान धरण व पंचतारांकित औद्योगिक वसाहत ही शिरूर तालुक्याला शरद पवार यांनी तालुक्यातील जनतेला दिलेली मोठी देणगी आहे.त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून दुष्काळी तालुका अशी ओळख असणारा तालुका शेती व औदयोगिक दृष्ट्या खऱ्या अर्थाने समृद्ध झाला आहे असे बोलताना पवार यांनी सांगितले. दरम्यान राष्ट्रवादी काँगेसचे अपक्ष उमेदवार शांताराम कटके,मांडवगण फराटाचे माजी सरपंच शिवाजी कदम व भाऊसाहेब जाधव यांनी आमदार अशोक पवार यांना जाहिर पाठिंबा दर्शविला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विश्वास ढमढेरे,कोरेगाव भीमाचे सरपंच संदीप ढेरंगे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद पवार पक्षाचे असंख्य कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

**वाचकांच्या लेखणीतून**

# हस्तिदंत आणि हस्तीअंत?

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।
साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने।।


प्रत्येक पर्वतावर माणिक सापडत नाहीत. हर हत्तीच्या मस्तकात मोती आढळत नाहीत. जगात माणसांची कमतरता नसूनही साधु (सज्जन) पुरुष निदर्शनास येत नाहीत. प्रत्येक वनात चन्दनाचे वृक्ष आढळत नाहीत. एखाद्या चांगल्या; पण दुर्मिळ असलेल्या वस्तूचे वर्णन या संस्कृत श्लोकात सुंदर उदाहरणांसहित सापडते.

आम्हाला शालेय वयात हा संस्कृत श्लोक पाठांतराला असायचा. आम्हाला तो खूप आवडायचा आणि त्यामुळे सहज पाठही व्हायचा. अजूनही तो पाठ आहे.

मध्यप्रदेशातील बांधवगड राष्ट्रीय उद्यानातील दहा हत्तींचा मृत्यू झाल्याने विषय गंभीर झाला आहे. कोडो मिलेट (एक प्रकारचे भरडधान्य) खाल्ल्याने या हत्तींचा मृत्यू झाल्याचे कारण वन्यजीव रक्षकांनी दिले आहे. पण इतर ठिकाणीही असे कोडो मिलेट खाल्ल्याने हत्तींचे मृत्यू झालेले नाहीत. मानवांनीच त्यांची शिकार केलेली आहे असे वन्यजीव अभ्यासकांचे मत असल्याचे कळते.

हस्तिदंतापासून शोभेच्या अनेक वस्तू बनविल्या जातात. त्यामुळे मृत हत्तींचे दात विकून समाजकंटक आपले उखळ पांढरे करून घेतात. त्यासाठी हत्तींचे प्राणहरण करणे मोठेच सामाजिक पाप किंवा गुन्हा आहे. मानवांसारखाच हत्तींसारख्या मूक प्राण्यांनाही जगण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे.

हत्ती या प्राण्याला आपल्या संस्कृतीत फार उच्च स्थान दिले गेले आहे. श्रीगणेशाची मूर्ती, पुराणे, अजंठा-वेरूळ येथील कोरीव शिल्पे यांतून हत्तींबद्दलचा आपला सद्भाव



आणि त्यांची महती आढळून येते. पूर्वी लढाईसाठी हत्तींचा वापर होई. त्यासाठी सैन्यात हत्तीदळ अस्तित्वात आले. जंगलातील मोठमोठे लाकडी ओंडके. मोठमोठे खडक किंवा दगडासारखे अवजड सामान वाहून नेण्यासाठी हत्ती उपयोगी पडत. दाखवायचे दात वेगळे; खायचे वेगळे, हस्तिदंती मनोरे, बिनीचा (आघाडीचा) हत्ती, ढालगज (गज=हत्ती), गजान्त लक्ष्मी हे शब्दप्रयोग किंवा चार आंधळे आणि हत्तीची गोष्ट यांतही हत्तींचे महत्त्व अधोरेखित झालेले आहे.हत्ती हे कळप करून राहणारे प्राणी आहेत. मध्यप्रदेशातील बांधवगड राष्ट्रीय उद्यानातील तेरा हत्तींच्या कळपातील दहा हत्तींची हत्या करण्यात आली. त्यांना दफन करतेवेळी तेथे कळपातील उरलेले तीन हत्ती आले. त्यांनी संबंधित गावच्या तीन माणसांना चिरडून मारले. आपल्या कळपातील साथीदारांची हत्या झाल्याचा सूड या उरलेल्या तीन हत्तींनी घेतला असावा. कारण हत्ती हे बुद्धिमान, संवेदनशील आणि तल्लख स्मरणशक्ती असलेले प्राणी असतात.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# शेवगावमध्ये रंगली सुरमयी दीपसंध्या मैफल!

## रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटी यांच्यातर्फे आयोजन सरकटे बंधूंनी सादर केली मराठी-हिंदी गीते

**शेवगाव : प्रतिनिधी**

**रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटी यांच्यातर्फे गायक प्रमोद सरकटे व स्वराज सरकटे यांच्या सुरमयी दीपसंध्या कार्यक्रमात बहारदार हिंदी व मराठी गाण्यांनी शेवगावकर श्रोते मंत्रमुग्ध झाले. श्रोत्यांनी सुचविलेल्या गाण्यांनाही 'वन्स मोअर' मिळवत सरकटे बंधूंनी शेवगावकरांची मने जिंकली. रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. काकासाहेब लांडे व सचिव मोहमंद वसिम यांनी सरकटे बंधू व त्यांच्या संचाचे स्वागत केले.**

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले, डॉ. मेधा कांबळे, विजय देशमुख, शरद जोशी, डॉ. विकास बेडके, युसूफ पठाण, महेश शेटे, संजय फडके, बंडू रासने, डॉ. संजय लड्डा, डॉ. गणेश चेके, मनेश बाहेती आदी यावेळी उपस्थित होते. श्री गणेशाला वंदन करणारे गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

शेवगाव-पैठण ही संताची भूमी असल्याचे सांगत गायक प्रमोद सरकटे यांनी भारतरत्न भीमसेन जोशी यांनी गायलेले 'जाता पंढरीसे सुख वाटे जीवा' हे गीत गायले. त्यानंतर भावगीत व बहारदार हिंदी व मराठी गाण्यांची




मैफलीची रंगत वाढत गेली. 'आली माझ्या घरी दिवाळी', 'चंद्रा' लावणी', 'चढता सुरज धिरे धिरे ढल जायेगा', 'तेरे जैसा यार कहाँ' अशी एकापेक्षा एक सरस गीते सरकटे बंधूंनी सादर करीत शेवगावकर श्रोत्यांचे मनोरंजन केले. रात्री सात वाजता सुरू झालेला कार्यक्रम रात्री साडेअकरा वाजेपर्यंत सुरू होता. श्रोत्यांकडून सुचवलेल्या गीतेही या वेळी सरकटे बंधूंनी गायली. त्यातील काही गाण्यांना वन्स मोअरची मागणी श्रोत्यांनी केली. त्यालाही प्रतिसाद देत शेवगाकर श्रोत्यांची टाळ्यांची दाद मिळवली.

राजश्री घुले यांनी रोटरीच्या सुरमयी दीपसंध्या या उपक्रमांचे कौतुक करीत अशा उपक्रमांनी सांस्कृतिक व कलेच्या क्षेत्राला बळकटी मिळत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक रोटरीचे अध्यक्ष लांडे यांनी, तर संतोष ढाकणे यांनी आभार मानले.

# दोन गटात हाणामारी; परस्पर विरोधी गुन्हे चार जण जखमी ; कामरगाव येथील घटना

**नगर : प्रतिनिधी**

**सेफ्टी टँक चा खड्डा खांदल्याच्या कारणावरून नगर तालुक्यातील कामरगाव शिवारात दोन गटात चाकू, दगड, लाकडी दांडक्याने हाणामारी झाल्याची घटना घडली. मारहाणीत चौघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

शोभा कातोरे (वय ५५ ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शरद नामदेव कातोरे, राजेंद्र नारायण लाळगे, सविता शरद कातोरे, श्रवण शरद कातोरे, विजय नारायण लाळगे, अनिता विजय लाळगे, सुनीता राजेंद्र लाळगे (सर्व रा. कामरगाव) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शोभा कातोरे यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, 'शनिवारी (ता.२) सायंकाळी सहाच्या सुमारास संशयित आरोपी यांना आमच्या घराच्या शेजारी खड्डा का केला असे विचारले असता त्याचा त्यांना राग येऊन त्यांनी मला दगडाने व मुलाला चाकूने मारहाण करून जखमी केले.'

सविता शरद कातोरे (वय ४३




) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून करण बबन कातोरे, बबन नामदेव कातोरे, रंजित बबन कातोरे, शोभा बबन कातोरे (सर्व रा. कामरगाव) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविता कातोरे यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, 'राजेंद्र लाळगे यांच्या जागेत सेफ्टी टँकचा खड्डा खांदल्याच्या कारणावरून मला व माझ्या पतीला शनिवारी (ता. २ ) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास संशयित आरोपी यांनी लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले. मी मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्डिंग करत असताना बबन कातोरे याने डोक्यात दगड फेकून मारला. मुलावर खोटा गुन्हा दाखल करून शिक्षण बंद करण्याची धमकी दिली'. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# निवडणुकीच्या निकालानंतर सत्तेची समीकरणे बदलणार?

## नवाब मलिकांनंतर दिलीप वळसे पाटील यांचे विधान | राज्यात राजकीय चर्चांना उधाण

**मुंबई : प्रतिनिधी**

**प्रत्येक पक्षाचे किती आमदार निवडून येतात त्यावर पुढील गणित अवलंबून आहे. कदाचित निवडणुकीच्या निकालानंतर काही समीकरणे बदलू शकतात, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी केले आहे. याआधी नवाब मलिक यांनी देखील निवडणुकीच्या निकालानंतर समीकरणे बदलू शकतात, असे म्हटले होते. आता दिलीप वळसे पाटलांनी असे वक्तव्य केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**

दिलीप वळसे पाटील एका मुलाखतीत म्हणाले की, पुढे काही होईल याबाबत आताच सांगता येणार नाही. एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुती आहे. दोन्हीकडे ३-३ पक्ष आहेत. उद्या कोणाचे सरकार येईल, ते थोडावेळी बाजूला ठेवू. प्रत्येक पक्षाचे किती आमदार येतील, ते बघावे लागणार आहे. त्यानंतर खरे जुळवले जाईल. त्यात निवडणुकीच्या निकालानंतर काही समीकरणे बदलू देखील शकतात. निकालानंतर बहुमत होत नसेल, तर सरकार स्थापनेसाठी काही ना काही करावे लागेल. ६ पक्ष असल्यामुळे गणित जुळवण्यासाठी भरपूर वाव असल्याचेही त्यांची यावेळी अधोरेखित केले.

आता दिलीप वळसे पाटील आणि तीन दिवसांपूर्वी नवाब मलिक यांनी निवडणुकीनंतरच्या राजकीय समीकरणांबाबत केलेल्या विधानांवरून २०२४ च्या निकालानंतरही २०१९ सारखी अनेक समीकरणे होतील का?, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

(पान १ वरून)

### महायुती सरकारने गरीबांसाठी तिजोरी खाली केली !

मतदार त्यांच्या पाठीशी उभे राहतील यात शंका नाही. त्यांना आम्ही मताधिक्य देणार असल्याचे चितळकर यांनी सांगितले.

आपण आपलं हित जपलं पाहिजे असे सांगून चितळकर पुढे म्हणाले, हे आपलं सरकार आहे. महायुती सरकारने सर्वसामान्यांसाठी कल्याणकारी योजना राबविल्याआहेत. विरोधकांना केवळ सत्ता हवी आहे. त्यासाठी ते जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. या सरकारची नाळ समाजाशी जोडली आहे. महायुती सरकारने आगोदर केलेली कामेच विरोधकांनी आपल्या घोषणापत्रात मांडली आहेत. युती शासनाने महिलांना सवलत, ज्येष्ठ नागरीकांना सवलत, लाडकी बहिण योजना, शेतक-यांना विमा, वीज बिल माफी केली आहे. भावनिक होऊन मतदान न करता आपला आवाज विधानसभेत कोण उठविणार हे पाहून मतदान केले पाहिजे.

### आमदार सौभाग्यवती प्रचाराच्या मैदानात !

कामे झाली आहेत. या माध्यमातून नागरिकांचे प्रलंबित प्रश्न व समस्या सुटल्याने आमदार संग्राम जगताप यांचे शहरातील नागरिकांशी ऋणानुबंध जुळत अतुट नाते निर्माण झाले आहे. त्यामुळे त्यांना या विधानसभा निवडणुकीत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रश्न सोडवायचे नाहीत,तर मग गोट्या खेळायच्या का?

## ▪ आ.प्राजक्त तनपुरे यांचा सवाल ▪ जन आशिर्वाद यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत ▪ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळण्यासाठी प्रयत्नशील



राहुरी : प्रतिनिधी

**उर्जा विभागाचा मंत्री असताना शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावले आहेत मात्र विरोधक ट्रान्सफॉर्मर बसविले म्हणून टिका करतात मंत्री होऊन शेतकऱ्यांचे प्रश्न जर सोडायचे नसेल मग तेथे काय गोट्या खेळायच्या का ? असा संतप्त सवाल तनपुरे यांनी उपस्थित करत भविष्यात शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज कशी मिळेल यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आ.प्राजक्त तनपुरे यांनी केले आहे.**

आज ( शुक्रवारी) सकाळपासून महाविकास आघाडीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांचा गुहा, गणेगाव, चिंचविहिरे, कणगर, मल्हारवाडी, घोरपडवाडी, मोमीन आखाडा गावांत जन आर्शिवाद यात्रेच्या निमित्ताने प्रचाराचा झंझावात दौरा झाला . गावागावात वाजत-गाजत फटाक्यांच्या आतषबाजीत तनपुरे यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच दत्तात्रय गाढे हे होते.

यावेळी बोलताना तनपुरे म्हणाले येणाऱ्या काळात देखील विजेचे प्रश्नांसह मूलभूत प्रश्न सोडविले जातील. आपण शेतकऱ्यांच्या हितासाठी दिवसा वीज कशी मिळेल यासाठी तसेच कुरणवाडी योजनेच्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन, पाठचाऱ्या, जिल्हा परिषद आदींसह विविध कामांकरिता सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे तनपुरे यांनी सांगितले.

### निळवंडेच्या कालव्याचा प्रश्न मार्गी लावला

**निळवंडे धरणाच्या कालव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असताना माजी आमदारांनी दहा वर्ष कुठलेही भरीव काम केले नाही आम्ही काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या समवेत जलसंपदा मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यामध्ये खऱ्या अर्थाने या परिसरामध्ये या कालव्याचे पाणी पोहोचू शकले आहे. त्यामुळे शेतकरी देखील सुजलम-सुफलाम झाला आहे.**

आ. प्राजक्त तनपुरे

यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आढाव, बाबासाहेब सोनवणे, रामदास बाचकर, गोरक नालकर, दत्तात्रय गाढे, सोन्याबापू उऱ्हे, सुयोग नालकर, अनिल घाडगे, नवनाथ मुसमाडे, भाऊसाहेब आडभाई, संकेत जाधव, सिराज इनामदार, मच्छिंद्र वरघुडे, भाऊसाहेब पटेकर, मच्छिंद्र वरघुडे, धनंजय बर्डे, राजेंद्र दिवे, किशोर दिवे, रावसाहेब जाधव, बन्सी जाधव, भाऊसाहेब दिवे, रघुनाथ गाढे, राजेंद्र आडभाई, संकेत जाधव, आदित्य घाडगे, बाळासाहेब भुजाडी आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासकामांची परतफेड केडगावकर मताधिक्याने करणार

## ▪ माजी नगरसेवक सुनिलमामा कोतकर यांचा ग्वाही ▪ आ.जगताप यांचे विकासासाठी मोठे योगदान

केडगाव : प्रतिनिधी

**महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांचे केडगावमध्ये जोरदार स्वागत झाले आहे. केडगावचे सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून अरुणकाका जगताप, आ.संग्राम जगताप हे केडगावच्या विकासासाठी मोठे योगदान देत सर्व नागरिकांच्या पाठीशी उभे असतात. आम्हीपण गेल्या दोन्ही विधानसभा निवडणुकीत मताधिक्य देवून त्यांनी केलेल्या कामांची परतफेड करत आहोत. याही निवडणुकीत त्यांना केडगाव मधून मोठे मताधिक्य देवून त्यांच्या विजयात वाटा उचलणार असल्याची ग्वाही माजी नगरसेवक सुनीलमामा कोतकर यांनी दिली.**



अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी शुक्रवारी सकाळी केडगाव उपनगरात प्रचार फेरी काढून नागरिकांच्या भेटी घेतल्या. केडगाव वेशीजवळ उमेदवार आ.जगताप यांचे ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आले.
यावेळी माजी नगरसेवक सुनीलमामा कोतकर, मनोज कोतकर, महेंद्र कांबळे, गणेश ननावरे, राहुल कांबळे, सुनील कोतकर, जालिंदर कोतकर, संजय लोंढे, पोपट कराळे, महेश गुंड, भाजपाचे पंकज जहागीरदार, धनंजय जामगावकर, शरद ठुबे आदींसह मोठ्या संख्यने परिसरातील नागरिक व महायुतीतील पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उमेदवार आ.संग्राम जगताप म्हणाले, केडगाव उपनगरात सर्व जनतेने माझे उत्स्फूर्त स्वागत केले आहे. केडगाव भागात झालेल्या विकास कामांमुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळेच याभागातून नागरिकांचे मोठे समर्थन मला मिळत आहे. याबद्दल मी केडगावकरांचे आभार मानतो. नगरमध्ये चांगल्या वातावरणात ही विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी असाच उत्स्फूर्तपणा कायम ठेवत येत्या २० नोव्हेंबरला आपला बहुमोल वेळ माझ्यासाठी देवून जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

माजी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, आ.संग्राम जगताप यांनी केडगावमध्ये खूप विकासकामे केली आहेत. यामध्ये अनेक वर्षांपासून रखडलेला अंबिकानगर ते शाहूनगर रस्त्याचे काम त्यांनी पूर्ण केले आहे. लिंक रोड ते झेंडा चौक रस्त्याचे काम पूर्णत्वास आहे. भूषणनगर ते कल्याणरोड या प्रमुख रस्त्यांचे कामांसह प्रभाग १६ व १७ मधील सर्व अंतर्गत रस्त्यांची कामे आ.जगताप यांनी मार्गी लावली आहेत. केडगाव मधील अनेक मंदिरांसाठी आ.जगताप यांनी निधी देवून सभागृह व सुशोभीकरणाची कामे केली आहेत. देवी रोडवरील ओढ्याच्या पुलाचे कामही पूर्ण झाले आहे. आबाल वृद्धांसाठी उद्याने उभारली आहेत. महिलांसाठी अद्यावत जिम त्यांनी दिली आहे. असे बरेच महत्वाची व प्रलंबित कामे आ.संग्राम जगताप मार्गी लावून केडगावच्या विकासात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे त्यांच्यावर येथील जनता खुश आहे. या निवडणुकीत त्यांचा विजय निश्चीत असून केडगाव मधून त्यांना मोठे मताधिक्य मिळणार आहे. या वेळी महेंद्र उपाध्ये महेश सरोदे सतीश कोतकर माजी नगरसेवक सुनील काकडे अजित कोतकर, भरत ठुबे, बहिरु कोतकर, कृष्णा लोंढे, संतोष गाडे, बाळासाहेब पठारे, सुरेश कोतकर, धोंडीराम पठारे, राजू कोतकर, सुजय मोहिते, योगेश कोतकर, नितीन गुंड, दीपक गिरे, सचिन पवार, किशोर जेजुरकर आदींसह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

## शाळेतील जुन्या आठवणींना मिळाला उजाळा



निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील श्री. मुलिकादेवी विद्यामंदिर,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निघोज येथे सन २००५ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच उत्साहात आणि आनंदमयी वातावरणात संपन्न झाला.**

शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या शिक्षकांसोबत पुन्हा एकदा नवी उर्मी अनुभवण्यासाठी शाळेचे माजी विद्यार्थी एकत्र आले होते. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लक्षणीय होती आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर शाळेच्या आठवणींनी उत्साह झळकत होता.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक कारभारी मेसे होते. जे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच आदर्श गुरु म्हणून ओळखले जातात. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी शाळेच्या दिवसांमधील शिस्त, मेहनत, आणि सहकार्याच्या अनुभवांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना जीवनातील योग्य मार्गावर चालण्याचे प्रेरणादायी विचार दिले.

यावेळी माजी प्राचार्य एकनाथ पठारे यांनी माजी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी शाळेतील शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर कसा सकारात्मक प्रभाव पडतो, याबद्दल मार्गदर्शन करताना जीवनात शालेय शिक्षणाच्या महत्वाची जाणीव करून दिली. माजी प्राचार्य भिमाजी घोलप यांनी शाळेच्या मूल्यांचा उल्लेख करत, त्या मुल्यांना अनुसरून आपल्याला पुढे कसे वाढावे याबाबत विद्यार्थ्यांना सल्ला दिला. माजी प्राचार्य रामचंद्र सुपेकर यांनीही आपल्या मार्गदर्शनातून शाळेतील संस्कार आणि शिस्त यांचा भविष्यकाळात कसा उपयोग होतो, याबद्दल सांगितले.
यावेळी आनाजी दळवी , श्रीमती.पुजारी मॅडम, शायरा बानू,बाबाजी शिंदे, बाजीराव झावरे, भाऊसाहेब झावरे, तबाजी पुजारी भाऊसाहेब लामखडे तसेच अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि शाळेबद्दल आणि येथील शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

हा माजी विद्यार्थी मेळावा केवळ आठवणींचा प्रवास नव्हता, तर एकमेकांना पुन्हा भेटून नवे उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरला. शाळेच्या सर्व मित्रांनी एकत्र येऊन कार्यक्रमाचे आयोजन अतिशय यशस्वीपणे केले. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, संघर्ष आणि यशोगाथा एकमेकांसोबत शेअर केल्या, ज्यामुळे वातावरण आनंदमयी आणि प्रेरणादायी बनले.
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निघोजचे तंटा मुक्ती अध्यक्ष मंगेश लाळगे, रामेश्वर श्रीमंदीलकर, एसटीआय अधिकारी योगेश सुपेकर, अमोल लंके, ज्ञानेश्वर वराळ, यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा . डॉ. सुभाष पांढरकर यांनी केले, सूत्रसंचालन योगेश सुपेकर यांनी तर मंगेश लाळगे यांनी उपस्थित मान्यवर आणि माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# वरिष्ठांच्या आदेशानेच महाविकास आघाडीच्या उमेदवारासोबत

## प्रियंकाताई खिलारी यांचे स्पष्टीकरण खासदार नीलेश लंके यांची घेतली सदिच्छा भेट



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर- नगर विधानसभा मतदार संघामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांना शिवसेना उबाठाच्या शिवसेना महिला तालुकाप्रमुख प्रियंकाताई खिलारी यांनी नुकतीच खासदार नीलेश लंके यांची -भेट घेऊन महाविकास आघाडीला पाठिंबा दिला आहे.**

विधानसभा निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेऊन तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी यापूर्वीच महाविकास आघाडीला वरिष्ठांच्या आदेशाने पाठिंबा दिलेला आहे. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार राणी लंके यांना यापूर्वीच पाठिंबा दिला आहे. महिला तालुकाप्रमुख प्रियंकाताई खिलारी यांनी नुकतीच निवडणुकीची रणनीती संदर्भात खासदार लंके यांच्यासोबत चर्चा विनिमय करण्यासाठी भेट घेतली.

यावेळी तालुकाप्रमुख प्रियंकाताई खिलारी म्हणाल्या शिवसेना हा पक्ष आदेशावर चालणारा पक्ष आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीची जागा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला मिळाली आहे येथे खासदार नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या उमेदवार आहेत. महाविकास आघाडीतील शिवसेना उबाठा गटातील सर्व पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणेच महाविकास आघाडीचे उमेदवार राणी लंके यांचे काम करण्याचे ठरविले असून आम्ही सर्व शिवसैनिक शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्वाखाली आता कामाला लागलो आहोत.
निवडणुकीची रणनिती व चर्चे संदर्भात खासदार निलेश लंके यांची भेट घेतली आहे. शिवसेनेतील सर्व महिला पदाधिकारी या राणीताई लंके यांच्या प्रचारात सक्रिय झाल्या आहेत. प्रियंकाताई खिलारी यांनी खासदार नीलेश लंके यांची भेट घेतली यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी नीलेश खोडदे, अशोक रोहोकले, संभाजी रोहोकले हे उपस्थित होते.

# डॉ. श्रीकांत पठारे राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय

## खा. नीलेश लंके यांच्या भेटीनंतर पठारे महाविकास आघाडीसोबत

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर मतदारसंघामध्ये शिवसेनेकडून उमेदवारीसाठी उत्सुक असलेले शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय झाले आहेत. खा. नीलेश लंके यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर डॉ. पठारे यांनी प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला.**



▪ शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी खा. नीलेश लंके यांच्याशी चर्चा केल्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला.

पठारे यांनी सांगितले की, महाविकास आघाडीकडून पारनेर-नगर मतदार संघाची जागा शिवसेनेला हवी अशी मागणी आम्ही पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्याकडे केली होती. उमेदवार म्हणून आपण तयारीही केली होती. मात्र जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच कायम राहिल्याने शिवसेनेला जागा मिळू शकली नाही. उमेदवारी जाहिर झाल्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर आपण अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता, मात्र पक्षश्रेष्ठींच्या आदेशानंतर आपण आपली उमेदवारी मागे घेतल्याचे पठारे यांनी सांगितले.

पठारे पुढे म्हणाले, विधानसभा निवडणूकीचा प्रचार सुरू झाल्यानंतर शिवसेना पक्ष प्रमुखांशीही चर्चा करण्यात आली. उमेदवारी मागण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. मतदार संघ मिळावा यासाठी पक्षाकडूनही प्रयत्न केले गेले मात्र महाविकास आघाडीच्या सुत्राप्रमाणे ज्या मतदारसंघात ज्या पक्षाचा आमदार त्याच पक्षाला उमेदवारी देण्याचे धोरण ठरलेले आहे. त्यामुळे शिवसेनेला जागा मिळाली नाही. महाविकास आघाडीचा धर्म म्हणून आघाडीतील सर्व घटक पक्ष एकत्र येऊन आघाडीतील उमेदवासाठी प्रचार करणार असल्याचे श्रेष्टींकडून सांगण्यात आले. त्यानंतर आपण खा. नीलेश लंके यांच्याशी चर्चा करून प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला.

### सर्व शिवसैनिक लंके यांच्या पाठीशी

**शिवसेनेचे सर्व पदाधिकारी तसेच शिवसैनिक महाविकास आघाडीचा धर्म पाळत उमेदवार राणी लंके यांच्या पाठीशी असून सर्वजण प्रचारात सहभागी झाले आहेत. महाविकास आघाडीच्या वज्रमुठीमुळे राणी लंके या विक्रमी मतांनी विजयी होतील.**

डॉ. श्रीकांत पठारे
तालुका प्रमुख शिवसेना

# आ. संग्राम जगताप यांच्या विकास यात्रेचे सावेडीत जल्लोषात स्वागत

## ज्येष्ठ नागरिकांशी साधला संवाद । महायुतीचे पदाधिकारी,कार्यकत्यांची मोठी उपस्थिती

सावेडी : प्रतिनिधी

**नगर शहर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ सावेडी गाव येथे भाजप शिवसेना राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून नागरिकांशी विकास यात्रेच्या माध्यमातून संवाद साधला, यावेळी नागरिकांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.**



यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर माजी महापौर बाबासाहेब वाकळे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, ज्येष्ठ नेते सुनील रामदासी, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, भाजपच्या महिला शहर जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे, माजी नगरसेविका आशाताई कराळे, वंदनाताई ताठे, सचिन पारखे , आकाश दंडवते, प्रशांत मुथा, बाळासाहेब वाकळे, दगडू मामा पवार, बाळासाहेब भुजबळ, पुष्कर कुलकर्णी , बाबासाहेब सानप, गोपाल वर्मा, रवींद्र बारस्कर, दीपक खेडकर, बाळासाहेब गायकवाड, महेश तवले, अनंत देसाई , वैभव सुरवसे, दिलीप काकडे, राजेंद्र काळे, मनोज ताठे, संपत नलावडे, योगेश गलांडे, शिवाजी चव्हाण, रेणुका करंदीकर पल्लवी जाधव,ऋषिकेश ताठे आदी उपस्थित होते.

यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर म्हणाले की, शहरामध्ये महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे, त्यांनी शासनाच्या माध्यमातून विकास कामांची गंगाच आणली आहे याचबरोबर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व खा. सुजय विखे पाटील यांनी देखील शहर विकासासाठी मोठ्या निधी उपलब्ध करून दिला. महायुती सरकारने राज्यात विकास कामांचा डोंगर उभा केला आहे विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले असल्यामुळे महायुतीचे सरकार येणार आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचविले आहेत असे ते म्हणाले.
माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की , नगर शहर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांचा विजय निश्चित झाला असून भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रचाराला लागले आहे असून घरोघरी जाऊन महायुतीने केलेल्या विकास कामाची माहिती दिली जात आहे असे ते म्हणाले.

### शहर विकासाला गती दिली

**नगर शहर विधानसभा मतदार संघातून महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रचाराच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांची माहिती देत आहे, आम्ही सर्वजण बरोबर असून शहर विकासाला गती दिली आहे, पुढच्या काळातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही काम करू असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.**

# आपली बहिण जिल्ह्यात सर्वाधिक मतांनी विजयी झाली पाहिजे

## बाळासाहेब हराळ यांचे आवाहन

नगर : प्रतिनिधी

**महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके या नगर तालुक्यातील असून आपली ही बहिण नगर जिल्हयात सर्वाधिक मतांनी विजयी झाली पाहिजे. राणी लंके मताधिक्क्याने विजयी होण्यातच आपल्याला किंमत असल्याचे जिल्हा परिषदचे मा. सदस्य बाळासाहेब हराळ यांनी सांगितले.**



महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ हराळ यांनी मतदारांशी संवाद साधला. ते म्हणाले, खा. शरद पवार यांचा शब्द पाळण्यासाठी नीलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. ग्रामपंचायत सदस्यही राजीनामा देत नसताना लंके यांनी आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर आपल्या काळजात धस्स झाले. पाच वर्षे मी जिल्हा परिषदेत नसल्याने माझ्या डोक्याचे भरीत झाले आहे. दुसरीकडे आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर चार महिने लंके यांनी कसे काढले असतील, त्यांना किती संघर्ष करावा लागला हे आपण पाहिले असल्याचे हराळ म्हणाले.

हराळ पुढे म्हणाले, दिलेला शब्द पाळणारा माणूस म्हणजे नीलेश लंके आहे. आपल्या पाठीशी आहोरात्र उभा राहणारा माणूस आहे. राणी लंके यांचा प्रचार करताना एकमेकांशी हेवेदावे करू नका. तुमची अडचण असल्यास थेट लंके यांना फोन करा, कोणाविषयी तिरस्कार करू नका. असा सल्ला हराळयांनी यावेळी दिला.

### राणी लंके यांना मंत्रीपदाची संधी

**प्रवरेला थोपविणारा एकच व्यक्ती होता, तो म्हणजे नीलेश लंके. दुसरा कोणी मायका लाल नव्हता. आता विधानसभेतही राणी लंके या इतिहास घडविणार आहेत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून या सरकारमध्ये राणी लंके यांना मंत्रीपदाची संधी मिळणार आहे. त्यासाठी आपली मुलगी, आपली बहिण स्वाभिमानाने विधानसभेत पाठवा. आपले मत वाया घालू नका असे आवाहन हराळ यांनी केले.**

### खराब हवामानात हेलीकॉप्टर उतरविण्याची किमया !

**राणी लंके यांना मोठे मताधिक्य देण्याची नगर तालुक्याची मोठी जबाबदारी आहे. माधवराव लामखडे यांचे हेलीकॉप्टर भरकटले होते. खराब हवामानातही ते सुरक्षित उतरविण्याची किमया नीलेश लंके यांनी केली.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com